# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - 04

# प्रसिद्धी निवेदन

**समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५**

महाराष्ट्र शासनाच्या **शासन पत्र क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र. ८१/टीएनटी १., दि. १५/०९/२०२२ व शासन निर्णय दि. २९/०८/२०२५** अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हापरिषद मधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी **"समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५"** या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने **दि. ०३/०२/२०२६ व ०४/०२/२०२६** या कालावधीत तीन सत्रामध्ये आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेस एकूण **४६०६८** परीक्षार्थ्यांनी ऑनलाईन आवेदनपत्र भरले होते. त्यापैकी परीक्षेस एकूण **३८५५९** परीक्षार्थी उपस्थित होते.

सदर परीक्षेचा निकाल आज **दि. १३/०३/२०२६** रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या परीक्षार्थी/उमेदवारांची महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET)/CTET या परीक्षेत उत्तीर्ण झाला असाल तर सर्वात पहिली परीक्षा उत्तीर्ण झालेल्याची माहिती https://mscepune.in/dtedola/KP२०२६Info.aspx या लिंक मध्ये भरण्याकरीता **दिनांक १६.०३.२०२६ ते २१.०३.२०२६** पर्यंत मुदत देण्यात आली होती.

तरी परीक्षार्थी/उमेदवारांमार्फत सदर माहिती भरण्याची मुदत वाढविणेबाबतची विनंती लक्षात घेता माहिती भरण्याकरीता **दिनांक २२.०३.२०२६ ते ३१.०३.२०२६** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

20/3/26

**डॉ. नंदकुमार बेडसे (भा.प्र.से.)**
**अध्यक्ष,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०४.

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : २०/०३/२०२६**